श्री गुरुदेवदत्त नागरी सह. पतसंस्था मर्या.

रजि. नं. : पीएनए / (पीएनए) आरएसआर (सीआर) ५२५ / १९८९-९०
अनुसया एन्क्लेव्ह, बिल्डींग सी, ऑफीस नं. एफ/१, जगताप चौक, वानवडी, पुणे ४०
960 797 9970 | shrigurudevdattasp@gmail.com | www.shrigurudevdattanagari.net

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

फक्त सभासदांसाठी

श्री गुरुदेवदत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, वानवडी, पुणे - ४११ ०४० आपल्या पतसंस्थेची ३५वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता, महात्मा ज्योतिबा फुले सांस्कृतिक भवन, वानवडी, पुणे - ४११ ०४०. येथे बोलाविण्यात आली आहे. सभेस खालील विषयांचा विचार होईल, तरी सर्व माननीय सभासदांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

-: सभेपुढील विषय :-

१. दि. २४।९।२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
३. सन २०२३-२४ चे वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व त्यांनी दिलेल्या अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
४. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे नफा वाटणीस मंजुरी देणे.
५. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या जमा खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६. सन २०२४-२५ चे वैधानिक लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधनास मान्यता देणे.
७. संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची कायदा कलम ७५(२) नुसार माहिती घेणे.
८. मा. सभासदांकडून दि.१९।०९।२०२४ पर्यंत आलेल्या लेखी सूचनांचा विचार करणे.
९. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

स्थळ : पुणे — मा. संचालक मंडळाचे आज्ञेवरुन,
दिनांक : १६।०८।२०२४ — **सौ. मनिषा विश्वास गोडसे**, सरव्यवस्थापक

सूचना :१) गणसंख्या (कोरम) अभावी तहकूब सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी ११:०० वा. सुरु करण्यात येईल, त्यावेळी सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२) माननीय सभासदांना काही सूचना किंवा काही विषय मांडावयाचे असल्यास ते लेखी स्वरुपात दि. १९।०९।२०२४ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळेत पाठवावेत.
(अहवालाची प्रत न मिळाल्यास जवळच्या शाखेत मिळेल, सभेस येताना ती सोबत आणावी)

ॲक्सिस बँक लि.

नोंदणीकृत कार्यालय : त्रिशूल, ३रा मजला, समर्थेश्वर मंदिरासमोर, लॉ गार्डन, एलिस ब्रीज, अहमदाबाद - ३८० ००६.
शाखा कार्यालय : ॲक्सिस बँक लि., स्टर्लिंग प्लाझा, तळमजला, साई सेवा पेट्रोल पंप समोर, जे.एम.रोड, पुणे-४११००४.

ताबा नोटीस (रुल ८(१))

ज्याअर्थी खाली सही करणार **ॲक्सिस बँक लि.** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३ (१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या **रूल ३** अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार यांना खालील नमूद तारखांना मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत त्यांच्या नावासमोर नमूद केलेली, बँकेला येणे असलेली रक्कम सदर नोटीसीच्या तारखेपासून **६० दिवसांच्या** आत परत करावी. कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्यामुळे विशेषत: खालील नमूद केलेले कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार तसेच सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ६ व ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेल्या गहाण मालमत्तांचा खालील नमूद तारखांना **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे. विशेषत: कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की त्यांनी सदर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास नमूद केलेल्या रकमेसाठी **ॲक्सिस बँक लि.** च्या रकमेच्या अधीन राहील. सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सरफेसी ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार/गहाणदार यांची नावे आणि पत्ते	तारखेनुसार थकबाकी (रु.)
१.	**१) समीर तानाजी चौधरी,** पार्वती नंदन हाऊस, दत्तवाडी, आकुरी, पुणे, महाराष्ट्र, भारत-४११०३५, **तसेच :** काळभोर चाळ, काळभोर नगर, चिंचवड, हनुमान मंदिराजवळ, पुणे-४११०१९, **तसेच :** हॉटेल कावेरी सेक्टर, प्लॉट नं.१६९, ट्रान्सपोर्ट नगर, निगडी, भक्ती शक्ती गार्डन जवळ, पुणे-४११०४४, **तसेच :** फ्लॅट नं.२०१ दुसऱ्या मजल्यावर 'विनायक प्लाझा' सर्वे नं.१०६/१, प्लॉट नं.०१, मु.वडगाव, ता.मावळ, जि.पुणे, **२) रेणुका समीर चौधरी,** पार्वती नंदन हाऊस, दत्तवाडी, आकुरी, पुणे, महाराष्ट्र, भारत-४११०३५, **तसेच :** फ्लॅट नं.२०१ दुसऱ्या मजल्यावर 'विनायक प्लाझा' सर्वे नं.१०६/१, प्लॉट नं.०१, मु.वडगाव, ता.मावळ, जि.पुणे,	**रु. १८,३२,३३३/- (रुपये अठरा लाख बत्तीस हजार तीनशे तेहतीस फक्त) दि. १३/१०/२०२२** रोजी देय असलेली रक्कम आणि (या रकमेत फक्त **दि. १३/१०/२०२२** पर्यंत लागू व्याजाचा समावेश आहे) **दि.१३/१०/२०२२** पासूनचे सदर रक्कम परत करेपर्यंतचे करारानुसार झालेले/होणारे व्याज, अनुषंगिक खर्च, शुल्क व्याजासहीत.
	मागणी नोटीसीची तारीख : २१/१०/२०२२	**प्रत्यक्ष ताबा घेतल्याची तारीख : ११/०९/२०२४**
	गहाण मालमत्तेचे तपशील : मालमत्तेचे सर्वसामाईक भाग, फ्लॅट नं.२०१, दुसऱ्या मजल्यावर, 'विनायक प्लाझा' नावाची बिल्डिंग, चटई क्षेत्रफळ ४२.१० चौ. मीटर., सर्वे नं.१०६/१ प्लॉट नं.०१, मु.वडगाव, ता.मावळ, जि.पुणे.	

दिनांक : ११/०९/२०२४ ठिकाण : पुणे — **(टिप : स्वैर भाषांतर तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य)** — **सही/- अधिकृत अधिकारी, ॲक्सिस बँक लि.**

Public Notice

A blue bag containing documents has gone missing during the Lonavala-Pune journey. Res. Original documents of property S. No. 7/8/5/7/2/7 Ganesh 1, Flat No. 11, Pimple Gurav Road, Dapodi Pune 12, also Driving License, Voter ID card etc. of Sunil Naik. is missing The bag is missing from passenger private vehicle during Lonavla-Pune journey on 25th August 2024. Contact if found.**[Vinayak Kulkarni-9579240118.**

शुद्धीपत्रक

पुणे अर्बन को-ऑप. बँक लि. यांची दि.०८/०९/२०२४ रोजी दै. लोकसत्ता मध्ये पान नं. १० वर जाहिरात प्रसिद्ध झाली असून सदर जाहिरातीमध्ये कर्जदार मे.डब्ल्यु.एस. डेव्हलपर्स यांचे कर्ज थकबाकी १०,३९,८१,१५१/- अशी झालेली आहे. **त्याऐवजी ९,३९,९९,१६६/- असे वाचावे.** जाहिरातीमधील इतर मजकुर आहे तसाच राहिल.

दि.:१२/०९/२०२४
ठिकाण : पुणे
प्राधिकृत अधिकारी
पुणे अर्बन को-ऑप. बँक लि.,पुणे

नमुना क. ७५ — **सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे**
जा. क्र/३५७६ : २०२४/ACG
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग पुणे वाडीया कॉलेज समोर, ४५-२, कै. बाळकृष्ण सखाराम ढोले पाटील मार्ग, पुणे-१ दि.०४/०९/२०२४

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:- ७७०/२०२४
सार्वजनिक न्यास नाव व नोंदणी क्र :-
ऑर्बिस एज्युकेशन सोसायटी, एफ-२६४३७/पुणे

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उप आयुक्त, पुणे विभाग पुणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल / अर्ज यासंबधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत-

वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

सदर न्यासाने बदल अर्ज क्र. ७७०/२०२४ दाखल केला आहे , सदर बदल अर्ज हा न्यासाच्या न्यापन व नियम व नियमावलीमध्ये केलेल्या बदलासाठी असुन, सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे, नंतर आलेल्या हरकतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत हरकत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील ही नोटीस माझे सहीनिशी व मी, धर्मादाय सहाय्यक आयुक्त-१, पुणे महाराष्ट्र राज्य, यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०४/०९/२०२४ रोजी दिली.

Asst. Charity Commissioner Pune

स्वाक्षरी/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे

बँक ऑफ इंडिया

नातं बँकिंग पलिकडचं !

फर्ग्युसन रोड शाखा
आदित्य सेंटीग्रा, विंग-बी, शॉप नं. ८ ते १२, ज्ञानेश्वर पादुका चौक, एफ सी रोड, शिवाजीनगर, पुणे-४११००५
फोन. ०२०-२५५३ २९५७, २५५३ २०७३
ई मेल: FergussonRd.Pune@bankofindia.co.in

प्रति,
श्री. आनंद राजाराम देशमुख
घर क्र. ९२०, तपोभूमी सोसायटी, दत्तवाडी, मोरेश्वर मंदिराजवळ,
पुणे - ४१११०३० (महाराष्ट्र)
महोदय,

सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत सूचना.

तुम्ही केलेल्या विनंतीनुसार, बँकेने तुम्हाला एकूण रु. २२,४०,०००.०० गृहकर्ज सुविधेअंतर्गत मुदत कर्ज सुविधा मंजूर केल्या आहेत. या सूचनेच्या तारखेपर्यंत आम्ही दिलेल्या विविध क्रेडिट सुविधा आणि त्याखालील थकबाकीचे तपशील खाली देत आहोत:-

सुविधेचा प्रकार	संमत रक्कम	थकी देणी
(अ) मुदत कर्ज	रु. २२,४०,०००.००	रु.२८,६८,८०५.६८ + व्याज दि. ३०.०४.२०२४ पासून

२. बँकेने दिलेल्या उपरोक्त क्रेडिट सुविधा खालील मालमत्ता/सिक्युरिटीजद्वारे सुरक्षित केल्या जातात (बँकेकडे प्रभावित असलेल्या मालमत्ता/संपत्तीचा तपशील):-
   (अ) निवासी फ्लॅट क्र. १०२, बिल्डिंग क्र. ए, कुणाल हाइट्स सर्व्हे क्र. ३४, हिस्सा क्र. १/१, नऱ्हे, जिल्हा पुणे येथे एरिया क्षेत्रफळ अंदाजे ६२५ स्क्वे. फूट श्री. आनंद राजाराम देशमुख यांच्या नावाने.
३. तुम्ही बँकेला नमूद कर्ज सुविधेच्या अंतर्गत देय असलेल्या भरणा करण्यामध्ये कसूर केली असल्याने आम्ही तुमच्या खात्याची **२९.०५.२०२४** पासून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेल्या निर्देश/मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे एन.पी.ए. खाते म्हणून वर्गवारी केली आहे.
४. उपरोक्त नमूद कारणांसाठी आम्ही तुम्हाला याद्वारे उपरोक्त नमूद कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत सूचना देत आहोत आणि तुम्हाला बँकेला रक्कम **रु. २८,६८,८०५.६८** अधिक व्याज @१०% प्र. व. मासिक शेष चक्रवाढ दराने व्याज आणि सर्व शुल्क, किंमत आणि बँकेद्वारे आकरण्यात आलेल्या खर्चाचा भरणा सदर सूचनेच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत करण्याची मागणी करत आहोत. असे जर न झाल्यास कृपया नोंद घेण्यात यावी की उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या सुरक्षित संपत्तीवर सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल सेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ अंतर्गत बँकेला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यात येईल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी आणि खर्च तुमचा असेल.
५. आम्ही तुम्हाला वर नमूद केलेल्या कालावधीत, बँकेला लागू व्याजासह संपूर्ण थकबाकी भरून, परतफेडीपर्यंत बँकेद्वारे आकारण्यात आलेला सर्व खर्च, शुल्क आणि किंमत आणि सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करून वरीलप्रमाणे तुमचे दायित्व पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे, कृपया महत्त्वाची नोंद घ्या की सरफेसी कायद्याच्या कलम १३(८) नुसार, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्याचा अधिकार केवळ सार्वजनिक लिलावासाठी किंवा सार्वजनिक किंवा खाजगी करारातून दरपत्रके किंवा निविदा मागवण्याची सूचना प्रकाशित केल्याच्या तारखेपर्यंतच तुम्हाला उपलब्ध असेल.
६. उपरोक्त नमूद अधिकारांचा वापर करून वसूल करण्यात आलेल्या रकमेचा वापर पहिल्यांदा सर्व शुल्क, किंमत आणि खर्च जो आमच्याकडून करण्यात आलेला आहे आणि त्यानंतर सदर सूचनेच्या दिनांकापासून प्रत्यक्ष वसुली पूर्ण होईपर्यंतच्या दिनांकापर्यंतच्या करारामधील व्याजासह उपरोक्त नमूद केल्यानुसार बँकेची देणी आणि शिल्लक रक्कम करण्यात येईल आणि त्यानंतर काही रक्कम शिल्लक राहिली असल्यास (बँकेला कर्जदार किंवा हमीदार यांच्याकडून जर बँकेला अन्य कोणतीही देणी देय असल्यास त्यासह) त्याची तुमच्याकडून पूर्ण वसूली करण्यात येईल.
७. सुरक्षित मालमत्तेच्या विरूद्ध दिलेल्या अधिकारांच्या वापरादरम्यान प्राप्त झालेल्या रकमेतून उपरोक्त नमूद देय रक्कमेची पूर्ण वसूली न झाल्यास, तर आम्ही कर्ज वसुली न्यायाधिकरण/न्यायालयाकडून कायदेशीरपणे तुमच्याकडून अनुषंगिक सर्व खर्चांसह देय शिल्लक रकमेच्या वसुलीसाठी वसुलीची कारवाई दाखल करून तुमच्या आणि तुमच्या इतर मालमत्तेविरूद्ध कारवाई करण्याचा आमचा अधिकार राखून ठेवतो.
८. कृपया नोंद घेण्यात यावी की उपरोक्त कायद्याच्या उप-कलम (१३) नुसार, सदर सूचना प्राप्त झाल्यानंतर, तुम्हाला विक्री, भाडेदार, परवाना, भेटवस्तू, गहाणखत याद्वारे वरील सुरक्षित मालमत्तेचा कोणतेही भार हस्तांतरित करण्यापासून किंवा निर्माण करण्यापासून प्रतिबंधित केले आहे.
९. सदर सूचना जारी करण्यासाठी आणि उपरोक्त कायद्याच्या कलम १३ अन्वये अधिकार वापरण्यासाठी खाली सही करणारे हे बँकेचे योग्य अधिकृत अधिकारी आहे.
१०. सदर सूचना बँकेकडे उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही अधिकार किंवा उपायांबाबत पूर्वग्रह न ठेवता तुम्हाला उद्देशून आहे हे नमूद करण्याची गरज नाही.

आपला विश्वासू,
सही/-
सूर्य प्रकाश
अधिकृत अधिकारी

ठिकाण : पुणे
दिनांक : ०५-०९-२०२४

नोट : इंग्रजीमधील नोटीस ग्राह्य धरण्यात येईल.

पंजाब नॅशनल बँक punjab national bank

...भरोसे का प्रतीक ! ...the name you can BANK upon!

सर्कल शस्त्र-कोल्हापूर : ११८२/१७, तळ मजला, राजारामपुरी, ४ थी लेन, टकाळा, कोल्हापूर-४१६००८. **ईमेल:** cs8264@pnb.co.in

ताबा नोटीस
(स्थावर मालमत्तेकरीता)

ज्याअर्थी खाली सही करणार **पंजाब नॅशनल बँकेचे** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या **रूल ३** अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार **मे. गुरुकृपा किराणा आणि भुसार मर्चंट (प्रोप्रा. श्री. आप्पासाहेब चनप्पा कणके)** यांना **दि. २२/०२/२०२३** रोजी **मागणी नोटीस** बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम **रु. १२,२८,६४३.७६ (रु. बारा लाख अठ्ठावीस हजार सहाशे त्रेचाळीस आणि पैसे शहात्तर फक्त) तसेच त्यावरील सदर संपूर्ण रक्कम परत करेपर्यंतचे व्याज** अशी सर्व रक्कम सदर नोटीसीच्या/नोटीस मिळालेल्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, विशेषत: कर्जदार तसेच सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सब-सेक्शन (४) सेक्शन १३ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा **दि. १० सप्टेंबर २०२४** रोजी **ताबा घेतला आहे.**

सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदार/ जामीनदार/ गहाणदारांचे लक्ष सदर कायद्याच्या सब सेक्शन ८ सेक्शन १३ अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **पंजाब नॅशनल बँक** यांना येणे असलेली रक्कम **रु. १२,२८,६४३.७६ (रु. बारा लाख अठ्ठावीस हजार सहाशे त्रेचाळीस आणि पैसे शहात्तर फक्त) तसेच त्यावरील व्याज** अशा सर्व रक्कमेच्या आधीन राहील.

स्थावर मालमत्तेचा तपशील

दक्षिणेकडील भागाचे क्षेत्रफळ ४६.४५ चौ. मी., पूर्वेकडील बाजुचा फायनल प्लॉट नं. ५६/७/४ (एकूण क्षेत्रफळ ३५५.८ चौ. मी) टीपी स्कीम नं.II, भवानी पेठ, सोलापूर, श्री. अप्पासाहेब चनप्पा कणके यांच्या मालकीचा.

दिनांक : १०/०९/२०२४, — **(श्री. अभिषेक अखौरी),**
स्थळ : सोलापूर — **अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक**

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, **श्री. महेश निवृत्ती शेटे, श्री. रवी निवृत्ती शेटे, श्री. विश्वास निवृत्ती शेटे व श्री. चेतन गणपत शेटे** हे खालील परिशीष्टात नमुद मिळकतींचे मालक असुन त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलास भाडेपटट्याने देण्याचे मान्य व कबुल केले आहे व सदर मिळकतीची त्यांची मालकी निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असुन सदर मिळकत त्यांचेच ताबेवहीवाटीस असल्याची हमी, खात्री व भरवसा सदर मालकांनी आमचे अशिलास दिला असुन सदर मिळकत आमचे अशिलास भाडेपटट्याने देता येणार नाही असा कोणताही वाद किंवा बोजा अस्तीत्वात नसल्याचीही हमी, खात्री व भरवसा त्यांनी आमचे अशिलास दिला आहे.

तरी या नोटीशीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीत किंवा तीचे भागात कोणाचेही, कसलेही हक्क हितसंबंध, अधिकार जसे गहाण, दान, लीज, लीन, बक्षीस, विक्री, करार, दावा, पोटगी, वहिवाट, कर्ज, विसार, ताबा, ट्रस्ट, वाटणी, अदलाबदल, भाडेकरार वगैरे प्रकारे हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ (चवदा) दिवसांचे आत** मुळ कागदोपत्रांनिशी खालील पत्यावर प्रत्यक्ष येऊन खात्री करून देवुन हरकत नोंदवावी. प्रत्यक्ष येवून हरकत न नोंदविल्यास सदर मिळकतीवर कोणाचे कसलेही हक्क व अधिकार नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे समजण्यात येईल.

परिशिष्ट

तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका मावळ जिल्हा पुणे मे. दुय्यम निबंधक मावळ यांचे कार्यकक्षेतील **गाव मौजे नवलाख उंबरे** येथील गट क्र. ३४२ यासी क्षेत्र ०२ हेक्टर ०१ आर व गट क्र. ३५३ यासी क्षेत्र ०४ हेक्टर ९२.३० आर पैकी क्षेत्र ०४ हेक्टर ७० आर असे एकुण क्षेत्र ०६ हेक्टर ७१ आर या मिळकती पैकी प्रस्तुतचे नोटीसीचा विषय असलेले क्षेत्र **गट क्र. ३४२ यासी क्षेत्र ०२ हेक्टर ०१आर व गट क्र. ३५३ पैकी क्षेत्र ०४ हेक्टर ०० आर असे एकुण क्षेत्र ०६ हेक्टर ०१ आर ही मिळकत** त्यासी चतु:सीमा खालील प्रमाणे:

पुर्वेस : रस्ता व गट क्र. ३५९ व ३५८.
दक्षिणेस : गट क्र. ३४१
पश्चिमेस : गट क्र. ३४३.
उत्तरेस : गट क्र. ३५३(भाग) व ३५४

पुणे, दिनांक - ११/०९/२०२४

बेंचमार्क लिगल सर्व्हीसेस एल.एल.पी. तर्फे
किरण खंडेलवाल, ॲडव्होकेट
५३८, डि-वींग, क्लोवर सेंटर, ७ मोलेदिना रोड, पुणे ४१०००१. फोन : ०२०-२६०५५८३६

यूनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India

भारत सरकार का उपक्रम — A Government of India Undertaking

उंड्री शाखा : सागर दीप होल वस्ती, क्र. १६, बिशप शाळेजवळ, उंड्री, पुणे-४११०६०.
ई-मेल: Ubin0561690@unionbankofindia.bank

ताबा नोटीस

ज्याअर्थी खाली सही करणार **युनियन बँक ऑफ इंडिया,** चे अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सेकण्ड) ॲक्ट २००२ (२००२ चा ५४) च्या सेक्शन १३ (१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून **कर्जदार सौ. पूजा मनोज शर्मा आणि श्री. मनोज जे. शर्मा** यांना **दि. ०१.०२.२०२४** रोजी मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम **रु. १५,५२,४९९.२५ (रुपये पंधरा लाख बावन्न हजार चारशे नव्याण्णव आणि पैसे पंचवीस फक्त)** सदर नोटीस मिळालेल्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार सदर रक्कम भरण्यास असमर्थ ठरल्यामुळे कर्जदार तसेच सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३ (४) आणि रूल ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन खाली नमूद केलेल्या **मालमत्तेचा दि. ६ सप्टेंबर, २०२४ रोजी ताबा घेतला आहे.**

विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो युनियन बँक ऑफ इंडिया, अस्ति वसुली शाखा, पुणे यांना येणे असलेली रक्कम **रु. १५,५२,४९९.२५ (रुपये पंधरा लाख बावन्न हजार चारशे नव्याण्णव आणि पैसे पंचवीस फक्त)** आणि त्यावरील व्याज अशा सर्व रक्कमेच्या अधीन राहील.

सुरक्षित अस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदार आणि जामीनदारांचे लक्ष सदर कायद्याच्या सेक्शन १३ (८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे. सदर नोटीस ही प्रादेशिक भाषेमध्ये सुद्धा प्रसिद्ध करण्यात येते. कोणत्याही प्रकारच्या स्पष्टीकरणासाठी मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य धरली जाईल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

मालमत्तेचा सर्व भूभाग फ्लॅट क्र. १०२ पहिल्या मजल्यावर स्थित, बिल्डिंग क्र. सी-१ CARNIC, प्रोजेक्ट न्याती इटर्निटी II म्हणून ओळखले जाते, सर्व्हे क्र. २५ (पूर्वीचा सर्व्हे क्र. २४), हिस्सा क्र. १, १/४, १/६, १/२, १/५ वर बांधण्यात आले आहे, गाव उंड्री, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे आहे जे स्थानिक ग्रामपंचायत उंड्री च्या हद्दीत आहे आणि सब रजिस्ट्रार हवेली यांच्या कार्यक्षेत्रातील आहे, कार्पेट एरिया क्षेत्रफळ अंदाजे ६४.५७ स्क्वे. मी. म्हणजेच ६९५ स्क्वे. फुट + ओपन आय लेवल टेरेस एरिया क्षेत्रफळ अंदाजे ४.५५ स्क्वे. मी. म्हणजे ४९ स्क्वेवे. फूट + ओपन कार पार्किंग जागा क्र. पीपी. **चतु:सीमा: उत्तर:** भू-बेअरिंग सर्व्हे क्र. २४, उंड्री, **दक्षिण:** भू-बेअरिंग सर्व्हे क्र. २५ हिस्सा क्र. १/३, उंड्री, **पूर्व:** भू सर्व्हे क्र. २५, पैकी हिस्सा नं १/१ उंड्री, **पश्चिम:** रस्ता

दिनांक : ६ सप्टेंबर, २०२४ — **प्राधिकृत अधिकारी,**
ठिकाण : उंड्री, पुणे — **युनियन बँक ऑफ इंडिया**

SBI

भारतीय स्टेट बँक, तणाव ग्रस्त आस्ति प्रबंधन शाखा-१, मुंबई, ''द आर्केड'', दुसरा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कोलाबा, मुंबई- ४००००५. ई-मेल : sbi.04107@sbi.co.in
अधिकृत अधिकारी : उदय किरण बी, मेल : team3.04107@sbi.co.in, मोबा. नं. ८१४३६६०४७०, दूरध्वनी (ऑफीस): ०२२-२२१७७६६७

(ई-लिलाव विक्री नोटीस)

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स च्या कलम ८(६) अन्वये बँकेस तारण दिलेल्या चल आणि अचल मालमत्तेची विक्री.

खाली सही करणार अधिकृत अधिकारी भारतीय स्टेट बँक यांनी सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४)अन्वये खाली दर्शविलेल्या मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे. तमाम जनतेस सूचित करण्यात येत आहे की खाली दर्शविलेल्या तारण मालमत्ता ई-लिलाव (सरफेसी कायदा २००२ अंतर्गत) पद्धतीने बँकेची येणी वसूल करण्याकरिता **'जसे आहे तसे आणि जे काही आहे ते व तिथे जे जे काही असेल ते'** या तत्वावर ई-लिलाव (ई ऑक्शन) **दि. ०६.०९.२०२४ रोजी** करण्याचे ठरविले आहे.

कर्जदारांची नावे	जामिनदाराचे नाव	येणे रक्कम ज्याकरिता मालमत्ता विक्रीस काढली आहे
मेसर्स मार्व्हलस मेटल्स प्रा. लि. (नोंदणीकृत पत्ता)- सी-१२, एमआयडीसी गोकुळ शिरगाव, कोल्हापूर शहर, जिल्हा कोल्हापूर, महाराष्ट्र- ४१६२३४.	**वैयक्तीक आणि कॉर्पोरेट जामीनदार** १. श्री. मानसिंग श्रीपतराव पवार २. श्री. शिवाजीराव श्रीपतराव पवार ३. श्री. सुरजित प्रतापराव पवार.	**तारणावर कर्ज घेतलेले जामीनदार मेसर्स मार्व्हलस मेटल्स प्रा. लि. यांचेकडून दि. ३१.०८.२०२४ रोजी रु. १८,५८,६३,२३२.०० अधिक करारातील दरा नुसार त्यावरील आजपर्यतचे व्याज, प्रासंगिक खर्च, शुल्क (वजा वसूल केलेली रक्कम) इत्यादी**

मालमत्ता धारकांची नावे : मेसर्स मार्व्हलस मेटल्स प्रा. लि.

चल मालमत्तेचा तपशिल	राखीव किंमत	बयाणा रक्कम(इएमडी)	बोली वाढ रक्कम
लॉट नं.१ : एमआयडीसी गोकुळ शिरगाव, तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर- ४१६२३४ येथील प्लॉट नं. सी-१२ आणि प्लॉट नं. ई-३ वरील प्लांट आणि मशिनरी तसेच जमीन आणि इमारत यांसह. क्षेत्र ४०५० चौ. मी. आणि ८१५८ चौ. मी. अनुक्रमे.	लॉट नं.१ रु. १९,२२,७९,८८२/-	लॉट नं. १ रु. १,९२,३०,०००/-	रु. १ लाख
लॉट नं. २ : एमआयडीसी गोकुळ शिरगाव, तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर- ४१६२३४ ये